आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ एप्रिल २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे, त्यांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका, असं  केंद्रीय गृहमंत्र्यांचं आवाहन

- नॅशनल हेराल्ड प्रकरणी ईडीकडून ६६१ कोटी रुपयांच्या मालमत्तांच्या जप्तीची प्रक्रिया सुरू

- राज्यातल्या २ जलविद्युत प्रकल्पांना केंद्रीय विद्युत प्राधिकरणाची मंजुरी

- वक्फ सुधारणा कायद्याच्या विरोधात पश्चिम बंगालमध्ये मुर्शिदाबादमध्ये झालेल्या हिंसाचारात तिघांचा मृत्यू, ११८ जण अटकेत

**आणि**

- बीजिंग आणि आसपासच्या भागात आलेल्या वादळामुळं शेकडो विमान रद्द

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला विचार वैश्विक आहे त्यांना महाराष्ट्रापुरता मर्यादित ठेवू नका असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. रायगड पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ बनवण्यासाठी आपलं सरकार कटीबद्ध आहे, असं त्यांनी सांगितलं. शालेय विद्यार्थ्यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली पाहिजे यासाठी उपाययोजना करण्याची सूचना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली.

**... होल्ड - बाईट- अमित शहा**

अरबी समुद्रात छत्रपती शिवरायांचं स्मारक उभारण्याचा प्रकल्प न्यायप्रविष्ट असल्याने थांबला आहे, तो पूर्ण करण्यासाठी राज्य शासन कसोशीने प्रयत्न करेल असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिलं. दिल्लीतही छत्रपतींचं स्मारक उभारावं अशी मागणी त्यांनी केली. भाजपाचे खासदार आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज छत्रपती उदयन राजे भोसले यांचंही यावेळी भाषण झालं. छत्रपती शिवरायांशी संबंधित पर्यटन स्थळांचं सर्किट विकसित करावं अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमापूर्वी अमित शहा यांनी पाचाड इथं जाऊन राजमाता जिजाऊ भोसले यांच्या समाधीला वंदन केलं. छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि मराठ्यांचा इतिहास तसंच संस्कृती यांच्यासाठी भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींचा या कार्यक्रमात रायगड स्मारक मंडळातर्फे सत्कार करण्यात आला.

**<><><><><>**

इटलीचे उप प्रधानमंत्री आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री अँतिनियो तजानी यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. भारत आणि इटली यांच्यातील व्यापार आणि गुंतवणूक वाढीसाठी अनुकूल वातावरण असल्याचं राष्ट्रपती मुर्मू यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी ईडीनं एजेएल कंपनीच्या ६६१ कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या मालमत्तांच्या जप्तीची प्रक्रिया सुरू केली. यामध्ये दिल्ली, मुंबई, लखनऊ इत्यादी महत्त्वपूर्ण जागांचा समावेश आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये या मालमत्तांचा तात्पुरता ताबा ईडीनं घेतला होता.

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी AJL कंपनीची २ हजार कोटी रुपयांची मालमत्ता यंग इंडिया कंपनीसाठी ५० लाख रुपयांना खरेदी केल्याचं ईडीला तपासात आढळून आलं होतं.

<><><><><>

केंद्रीय विद्युत प्राधिकरणानं साडेसात गिगावॅट क्षमतेच्या सहा पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्पांना आज मंजुरी दिली आहे. यात रायगड जिल्ह्यात भिवपुरी इथं एक हजार मेगावॅट तर नाशिक जिल्ह्यात इगतपुरी जवळ असलेल्या भावली इथं दीड हजार मेगावॅट क्षमतेच्या जलविद्युत प्रकल्पांचा समावेश आहे. इतर प्रकल्प ओदिशा, कर्नाटक, मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेशातले आहेत.

<><><><><>

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी रोझ व्हॅली प्रकरणातल्या *Asset Disposal Committee* चे अध्यक्ष डी के सेठ यांच्याकडे ५१५ कोटी रुपयांहून अधिक रकमेचा डिमांड ड्राफ्ट आज सुपूर्द केला. मूळ गुंतवणूकदारांना मालमत्ता परत करण्यासाठी ही समिती स्थापन केली आहे. या रकमेतून समितीकडे दाखल झालेल्या ३१ लाख दाव्यांपैकी साडेसात लाख गुंतवणूकदारांच्या रकमा अंशतः परत करणं शक्य होणार आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये मुर्शिबाद जिल्ह्यात वक्फ सुधारणा कायदा २०२५ विरोधात काल झालेल्या हिंसाचारात ३ जणांचा मृत्यू झाला.  या हिंसाचार प्रकरणी ११८ जणांना अटक करण्यात आली आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी लोकांना संयम राखण्याचं आवाहन केलं आहे. तोडफोड करणाऱ्यांना शिक्षा केली जाईल तसंच वक्फ सुधारणा कायदा २०२५ पश्चिम बंगालमध्ये लागू

केला जाणार नाही असं त्यांनी समाजमाध्यमावर केलेल्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. कोलकाता उच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठानं मुर्शिदाबादमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या नियुक्तीचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

उत्तराखंडतल्या टिहरी जिल्ह्यात ऋषिकेश बद्रीनाथ महामार्गावर गाडी अलकनंदा नदीत पडून झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. यात अपघातात जखमी झालेल्या महिलेला रुग्णालयात दाखल केलं आहे. मृतांमध्ये एक महिला, दोन लहान मुलं आणि दोघा पुरुषांचा समावेश आहे.

<><><><><>

राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी राज्यपालांनी राखून ठेवलेल्या विधेयकांवर राष्ट्रपतींनी ३ महिन्यात निर्णय घ्यावा. यापेक्षा अधिक उशीर होणार असेल तर त्याची योग्य कारणं राज्यांना दिली जावी, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. तामिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी १० विधेयकं रोखून ठेवल्याप्रकरणी दिलेल्या निकालात न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती महादेवन यांच्या खंडपीठानं हा निकाल दिला आहे. काल हे निकालपत्र सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर टाकण्यात आलं. तीन महिन्यात काहीही निर्णय आला नाही तर राज्य सरकारांना न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार असेल. कालमर्यादा ठरवून देऊन राज्यपालांच्या अधिकारावर गदा आणत नसल्याचं सर्वोच्च न्यायालयानं स्पष्ट केलंय. राज्यपालांनी त्यांचे मतभेद लोकशाही पद्धतीने दूर करावे, असंही न्यायालयानं म्हटलं.

<><><><><>

तांत्रिक बिघाडामुळे देशभरात आज युपीआयच्या सेवा विस्कळीत झाल्यानं कोट्यावधी ग्राहकांची गैरसोय होत आहे. यामुळं अनेक बँकांच्या ॲपच्या कामावर

परिणाम झाला आहे. ही तांत्रिक अडचण दूर करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियानं कळवलं आहे.

दररोज सरासरी ५९ कोटी व्यवहार युपीआय द्वारे होतात आणि त्यातून ८० हजार कोटी रुपयांची देवाणघेवाण होते.

**<><><><><>**

पंजाबमधील भाजपचे ज्येष्ठ नेते आणि राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य मनोरंजन कालिया यांच्या जालंधर इथल्या घरावर झालेल्या ग्रेनेड हल्ल्याप्रकरणातील मुख्य आरोपीला पोलिसांनी आज दिल्लीतून अटक केली. याप्रकरणातील प्रमुख आरोपी सैदुल अमीन असून तो उत्तर प्रदेशचा रहिवासी असल्याची माहिती पंजाब पोलिस प्रमुख गौरव यादव यांनी दिली.

**<><><><><>**

सुदानच्या दारफूर इथं RSF नं काल केलेल्या हल्ल्यात किमान ३२ नागरिक ठार झाल्याचा दावा सुदानच्या लष्करानं केला आहे. मृतांमध्ये चार महिला आणि दहा मुलांचा समावेश आहे. या हल्ल्यात १७ नागरिक जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

चीनमध्ये बीजिंग आणि उत्तर भागात आलेल्या वादळामुळे शेकडो उड्डाणं रद्द करण्यात आली आहेत. तर काही हाय-स्पीड रेल्वे मार्गावरच्या सेवाही बंद करण्यात आल्या आहेत. बीजिंगच्या दोन्ही प्रमुख विमानतळांवर ८३८ उड्डाण रद्द करण्यात आली. बीजिंगमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्याची ही दशकातली पहिलीच वेळ आहे. ताशी १५० किलोमीटर वेगानं वाहणाऱ्या जोरदार वाऱ्यांमुळे ऐतिहासिक पर्यटन स्थळे देखील बंद आहेत.

**<><><><><>**

हैदराबादमधे आज झालेल्या वेव्हज ऍनिम आणि मांगा स्पर्धेत हजारो स्पर्धक आणि संस्थांनी सहभाग नोंदवला.  ऍनिम, मांगा, वेबटून्स, कॉस्प्ले यासारख्या क्षेत्रांमध्ये तरुणांना प्रोत्साहन देणं हा या स्पर्धेचा हेतू आहे. ऍनिम आणि मांगा क्षेत्रात पुढच्या पिढीला ओळख मिळवून देण्यासाठीचं हे व्यासपीठ आहे, असं मीडिया अँड एंटरटेनमेंट असोसिएशन ऑफ इंडियाचे सचिव अंकुर भसीन यांनी सांगितलं.

<><><><><>

वेव्हज परिषदेमधे रेझोनेट द ईडीएम चॅलेंज स्पर्धेच्या पहिल्या दहा उत्कृष्ट स्पर्धकांच्या नावांची घोषणा आज करण्यात आली. यात महाराष्ट्रातल्या श्रीकांत वेमुला, मयांक वाढानी, क्षितीज खोडवे, आदित्य दिलबागी, सुमित चक्रबोर्ती, मार्क सिमलीह, नोबज्योती बोरूआ, आसाममधल्या आदित्य उपाध्याय, दिब्यजित राय, आणि नवी दिल्लीतल्या देवांश रस्तोगी यांचा समावेश आहे. या स्पर्धकांना १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेच्या अंतिम फेरीमध्ये आपल्या कलेचं सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे.

<><><><><>

आय एम ओ अर्थात आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेनं नौवहन उद्योगावर लागू केलेल्या जगातल्या पहिल्या जागतिक कार्बन कराला भारतासह ६३ देशांनी मान्यता दिली आहे. हवामान बदलाच्या समस्येवर मात करण्यासाठी कराच्या मसुद्यानुसार सागरी इंधन प्रमाणक आणि हरित वायू उत्सर्जन दरपत्रक अनिवार्य राहील. वर्ष २०२८ पासून जहाजांना कमी उत्सर्जन करणारी इंधनं वापरणं अथवा त्यांनी उत्पन्न केलेल्या प्रदूषणासाठी शुल्क भरावं लागेल.

<><><><><>

प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना आणि कदंब नृत्य केंद्राच्या संस्थापक कुमुदिनी लाखिया यांचं आज निधन झालं. त्या ९५ वर्षांच्या होत्या.  कथ्थक नृत्यामधल्या

त्यांच्या कार्यासाठी यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनी पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होतं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दुपारी झालेल्या सामना लखनौ सुपर जायंट्स ६ गडी राखून जिंकला. गुजरात टायटन्सनं दिलेलं १८१ धावांचं आव्हान त्यांनी ३ चेंडू शिल्लक असताना ४ गडी गमावून साध्य केलं.

दुसऱ्या सामन्यात शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा किंग्स इलेव्हन पंजाबनं ७ षटकात २ बाद ९२ धावा केल्या होत्या. सनराइजर्स हैदराबाद विरोधातल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून पंजाबनं प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>